आर.सी.सी. १२३/२०२०
सरकार वि. जनार्धन नवले.
**निशाणी २०**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव —सुदर्शन नामदेव लांडे, वय — ३१ वर्षे,
व्यवसाय — नोकरी, राहणार — नवलेवाडी फाटा–अकोले,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत** –

१. मी नवलेवाडी फाटा–अकोले येथील श्रेया रेसिडेन्सी मध्ये राहण्यास आहे. तेथे आम्ही जनार्धन नवले यांच्याकडून दोन फ्लॅट घेतले होते.

२. घटना दिनांक २२.०४.२०२० रोजी सकाळी ०९:३० वाजता श्रेया रेसिडेन्सी येथील आमच्या फ्लॅटमध्ये घडली होती. त्यावेळी घरातील पाणी संपले होते. माझे वडील नामदेव पुनाजी लांडे हे टेरेसवर पाहण्याकरीता गेले होते. त्यांनी जनार्धन नवले यांना टाकीमध्ये पाणी का नाही सोडले असे विचारले. माझे वडील हे फ्लॅट मध्ये आले, त्यावेळी आरोपीने त्यांच्यावर हात उचलला. त्यावेळी त्यांच्या तोंडाला लागले व त्यांचा दात पडला. आईला त्यांनी ढकलून दिले. मी वरच्या फ्लॅटमध्ये झोपलेलो होतो. माझ्या आईने वरती बोलावून आवाज दिला. मी खालच्या फ्लॅट मध्ये आलो. त्यावेळी वडील पडलेले होते. त्यांच्या तोंडातून रक्त येत होते. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला आलो. तेथे पोलीसांनी केस नोंदवली व उपचाराकरीता सरकारी दवाखान्यात पाठवले. वडीलांचा बीपी लो झाल्यामुळे आम्ही भांडकोळी डॉक्टरांकडे गेलो. तेथे गोरडे डॉक्टरांना हॉस्पीटलमध्ये बोलावून घेतले व दाताची ट्रीटमेंट केली. पोलीसांनी

माझ्याकडे चौकशी करून माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत</u> –

३. हे म्हणणे खरे नाही की, श्रेया रेसीडेन्सी व जनार्धन नवले यांचा काहीही संबंध नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ते त्या रेसीडेन्सीचे डेव्हलपर्स आहेत. आरोपी हे श्रेया रेसीडेन्सीचे डेव्हलपर्स असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेच्या वेळी मी आमच्या वरच्या फ्लॅटमध्ये झोपलेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगितलेली तथाकथित मारहाणीची घटना माझ्या समक्ष घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेल्या घटनेच्या चार वर्ष अगोदरच माझ्या वडीलांचा दात पडलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझा प्रेम विवाह असल्यामुळे व तो माझ्या आईवडीलांना मान्य नसल्यामुळे आमच्यामध्ये व आईवडीलांमध्ये नेहमी भांडण होत असते.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेल्या घटनेच्या दिवशी जनार्धन हा त्याच्या मित्राकडे आला होता व त्याने भांडण करू नका असे समजावले. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यावेळी माझे लग्नच झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला समजावून सांगितल्याने त्याचा आम्हाला राग आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जनार्धन नवले याने माझ्या आईला व वडीलांना मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या तोंडातून रक्तही येत नव्हते व त्यांचा दातही पडला नव्हता.

५. मी पोलीसांना जबाब देतवेळी असे सांगितले होते की, "माझ्या वडीलांचा बीपी लो झाल्यामुळे आम्ही भांडकोळी डॉक्टरांकडे गेलो, तेथे गोरडे डॉक्टरांना हॉस्पीटलमध्ये बोलावून घेतले व दाताची ट्रीटमेंट केली''. परंतु, सदरची बाब पोलीसांनी माझ्या जबाबामध्ये का नमूद केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, ''घटना दिनांक २२.०४.२०२० रोजी सकाळी ०९:३० वाजता श्रेया रेसिडेन्सी येथील आमच्या फ्लॅटमध्ये घडली होती'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ''त्यावेळी घरातील पाणी संपले होते, माझे वडील नामदेव पुनाजी लांडे हे टेरेसवर पाहण्याकरीता गेले होते, त्यांनी जनार्धन नवले यांना टाकीमध्ये पाणी का नाही सोडले असे विचारले'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, "माझे वडील हे फ्लॅट मध्ये आले, त्यावेळी आरोपीने त्यांच्यावर हात उचलला, त्यावेळी त्यांच्या तोंडाला लागले व त्यांचा दात पडला, आईला त्यांनी ढकलून दिले'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, "मी वरच्या फ्लॅटमध्ये झोपलेलो होतो, माझ्या आईने वरती बोलावून आवाज दिला, मी खालच्या फ्लॅट मध्ये आलो, त्यावेळी वडील पडलेले होते, त्यांच्या तोंडातून रक्त येत होते'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, "वडीलांचा बीपी लो झाल्यामुळे आम्ही भांडकोळी डॉक्टरांकडे गेलो, तेथे गोरडे डॉक्टरांना हॉस्पीटलमध्ये बोलावून घेतले व दाताची ट्रीटमेंट केली'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला समजावून सांगितल्याचा राग आल्यामुळे माझ्या आईने आरोपीविरूध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आईच्या सांगण्यावरून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

आर.सी.सी. १२३/२०२०
सरकार वि. जनार्धन नवले.
**निशाणी २०**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.11.11 18:09:30 +0530

दिनांक ११.११.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले